“राज्य उत्पादन शुल्क भवन" या इमारतीच्या सुरक्षेसाठी सुरक्षा रक्षकांच्या सेवा घेण्यास मान्यता देण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांक बीजीटी-१०२४/प्र.क्र.२८८/राउशु-१**
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.
दिनांक: २१ ऑक्टोबर, २०२६.

वाचा:-

१) शासन निर्णय, गृह विभाग क्र.बीजीटी-१०२३/प्र.क्र.२८८/राउशु-१, दि.०५ मार्च, २०२४
२) शासन शुध्दीपत्रक क्र.बीजीटी-१०२४/प्र.क्र.२८८/राउशु-१, दि.२८.०३.२०२५
३) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.विअप्र-२०२६/प्र.क्र.२२/विनियम,दि.११ ऑगस्ट, २०२६
४) आयुक्त कार्यालय, राज्य उत्पादन शुल्क यांचे क्र. बीएलडी-११२०२३/५४ ई-२५१९६०८/सहा, दि.०१.०९.२०२६

**प्रस्तावना:**

राज्य उत्पादन शुल्क विभाग मुख्यालयाची नविन इमारत “राज्य उत्पादन शुल्क भवन” ही बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या मागे, फोर्ट, मुंबई येथे उभारण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने उपरोक्त संदर्भाधीन क्र.४ च्या पत्रान्वये या इमारतीसाठी महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाकडून सुरक्षा रक्षकांच्या सेवा घेण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला आहे. त्यानुसार सदर प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

संदर्भाधीन पत्रान्वये आयुक्त,राज्य उत्पादन शुल्क कार्यालयाने सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने राज्य उत्पादन शुल्क भवन” या प्रशासकीय इमारतीच्या सुरक्षेसाठी सुरक्षा रक्षकांकरीता मार्च, २०२६ ते फेब्रुवारी, २०२७ या कालावधीसाठी अंदाजित **रु.३१,४०,६२५/-(अक्षरी रुपये एकतीस लाख चाळीस हजार सहाशे पंचवीस फक्त)** इतक्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

**अटी व शर्ती:-**

१) अशा सेवा उपलब्ध करुन घेताना आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, मुंबई यांनी उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र.एमजीए-१५०६/प्र.क्र.९२/काम-५, दि.०८.११.२००६ व शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र.भांखस-२०१४/प्र.क्र.८२५/भाग-अ/उद्योग-४, दि.०१.१२.२०१६ व वेळोवेळी निर्गमित केलेल्या धोरणानुसार प्रक्रिया पार पाडली असल्याची खात्री करावी.

२) सुरक्षारक्षकांची कंत्राटी पध्दतीने सेवा घेतांना कामगार कायद्यातील तरतूदींचे तसेच मा.न्यायालयाच्या आदेशांचे उल्लंघन होणार नाही व शासनाच्या प्रचलित धोरणांशी करारनाम्यातील तरतूदी सुसंगत असतील याची आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांनी खात्री करावी.

३) संदर्भाधीन क्र.१ च्या शासन निर्णयान्वये राज्य उत्पादन शुल्क भवन साठी मान्य केलेल्या सुरक्षा रक्षकांची संख्या कमाल मर्यादा असून खर्चामध्ये बचत करण्याच्या दृष्टीने गरजेनुसार त्यांची संख्या आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांनी मंजूर करुन घ्यावी.

४) सदरचा खर्च वित्तीय नियमनुसार विहित पध्दतीने करावा तसेच याबाबत प्रत्यक्ष कार्यादेश काढण्यापुर्वी तरतूद उपलब्ध असल्याची खात्री करावी.

५) शासन परिपत्रक वित्त विभाग, क्र.पदनि-२०१३/प्र.क्र.११/१३/विसू-१, दि.०२.०२.२०१३ क्र.पदनि-२०१३/प्र.क्र.११२/१३/विसू-१, दि.०२.१२.२०१३ व दि.१९.१२.२०१३ मधील तसेच या आदेशात वेळोवेळी केलेल्या सुधारणा/तरतूदींचे पालन करणे आवश्यक राहील.

२. सदर शासन निर्णय वित्त विभाग, शासन निर्णय क्र.विअप्र-२०२६/प्र.क्र.२२/विनियम, दि.११ ऑगस्ट, २०२६ अन्वये वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८, भाग-पहिला, उपविभाग-चार मधील अ.क्र.१० अनुसार बाह्य यंत्रणेकडून करुन घेण्यात येणाऱ्या कामाचा खर्च मंजूर करण्यास प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. प्रस्तुत प्रकरणी होणारा खर्च मागणी क्र.बी-२, प्रधानशीर्ष २०३९, राज्य उत्पादन शुल्क विभाग, उपशिर्ष-०० ००१ संचालन व प्रशासन, गौणशिर्ष-(०१)(०१) आयुक्त कार्यालय आस्थापना-(२०३९ ००१४) (दत्तमत) (अनिवार्य) मधील १०-कंत्राटीसेवा या बाबी खालील चालु वर्षाच्या अर्थसंकल्पीय तरतूदीमधून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०२६१०२११११२७४००७२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SURAJ SURESH BELEKAR

Digitally signed by SURAJ SURESH BELEKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Home Department, 2.5.4.20=B25AB9D6185AFB975695729F0D555181C870F4196C6EA97DBCB98C0BE8D78500, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=430860E347E6D3A9ADC71ABF4F4174EE98650EBC28B081F6BA760C324A5300E6, cn=SURAJ SURESH BELEKAR
Date: 2026.10.21 11:28:32 +05'30'

**(सुरज बेलेकर)**

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. सचिव (रा.उ.शु.) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
२. आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
३. महालेखापाल-१/२ (लेखा परीक्षा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर,
४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
५. निवडनस्ती (राउशु-१).